शिक्षण विभाग (प्राथमिक),
पुणे महानगरपालिका
जा.क्र. / खाप्राशा / 8324 / 2018–2019
दि. 2/11/18

प्रति,

मुख्याध्यापक,
जनकल्याण प्रतिष्ठान संचलित न्यू पूना स्कूल,
स.नं.94 / 7, भुसारी कॉलनी, पौड रोड,
कोथरूड, पुणे–411038

विषय– जून 2017 पासून नैसर्गिक वाढीने इ. 4 थी व जून 2018 पासून इ. 5 वी च्या फक्त एका वर्गास कायम विनाअनुदानित परवानगीबाबत

संदर्भ–1. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हिएलएस / 1002 / (1000 / 2002) / प्राशि–3 दि. 23 / 09 / 2002

2. सहा. प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक,पुणे मनपा यांची दि. 31 / 10 / 2018 ची शिफारस

संदर्भाकीत शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, तुमच्याकडील ~~मराठी~~ इंग्रजी English माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस जून 2017 पासून इ. 4 थी व जून 2018 पासून नैसर्गिक वाढीने इ. 5 वी च्या एका वर्गास कायम विनाअनुदानित तत्वावर व भविष्यात कोणत्याही अनुदानाची मागणी करणार नाही, भविष्यात सदर वर्गाचे माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

2-11-18

(शिवाजी दौंडकर)
प्रशासकीय अधिकारी
शिक्षण विभाग प्राथमिक,पुणे मनपा

2528353 6

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
शिवाजीनगर,पुणे - ४११००५
जा.क /खाप्राशा/३५५६/१६-१७
दि. ४/१०/१६

प्रति ,
न्यू पूना स्कूल ,
कोथरूड , पुणे ३८

विषय - कायम विना अनुदान तत्वावरील शासनमान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्गांना परवानगी देणेबाबत

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस -१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि.२३/९/२००३

उपरोक्त विषया संबंधिचा तुमचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक सन |
|---|---|---|---|---|
| १. | न्यू पूना स्कूल | इंग्रजी | २ री व ३ री | २००६- ०७ पासून |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवळी केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे .
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५ सदर मंजूर करण्यात येण-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणं आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असल्याचे निदर्शनास आल्यास तुकडी / वर्गमान्यता रदद करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९. आर. टी. ई ॲक्ट २००९ चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकारी
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

१७३०/३४

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी )**

जाक्र. प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी /२०१६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 21 JAN 2016

प्रति
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे

विषय: प्रथम मान्यता मिळणेबाबत
जनकल्याण प्रतिष्ठाण,भुसारी कॉलनी कोथरूड पुणे ३८

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३
दि. १६.०५.२००६
२.आपले पत्र जा.क्र.शिक्षण/प्राथ/खाप्राशा-२/३८/२०१५- दिनांक २२/०९/२०१५

३.मा. शिक्षण प्रमुख मनपा पुणे यांचे पत्र जा क्रं. खाप्राशा/८३५८/२०१२-१३
दिनांक २०.३.२०१३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेस संदर्भ क्र-१ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २००५-०६-या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ व ३ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र.२ व ३ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००५ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | जनकल्याण प्रतिष्ठान, शिवप्रसाद अपार्टमेंट,भुसारी कॉलनी, पुणे २९ | कोथरूड पुणे २९ | १ ली | इंग्रजी | जुन २००५ |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूचनांनुसार कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.